PC-3 Data- D/Circular (vikas)

# मुंबई विद्यापीठ

**No. Aff./ICC/ (2023-24)/ 16/ of 2023**

## परिपत्रकः

विषयः अशासकीय महाविद्यालयांच्या नॅक मुल्यांकन/ पुनर्मुल्यांकन व मानांकनाबाबत.

संदर्भः शासन परिपत्रक क. संचालनालयाचे

१) पत्र क. एनजीसी/२०१९/नॅक/सर्वविभाग/औवि/मवि.३/१३२२४ दि.२६.०९.२०१९ वसमक्रमांक/ सर्वअनु.म.वि.(११८)/जेडी/ औवि/मवि.३, दि. ०१.०४.२०१९,

२) पत्र क. एनजीसी/२०१९/नॅक/सर्व अशा. अनु.म. वि./औवि/मवि.३/६४६९ दि.२५.०५.२०२१,

३)पत्र क. एनजीसी/२०१९/नॅकमुल्यांकन—बैठक (१०५) /औवि / मवि. ३/१३४२८ दि. १६.११.२०२१,

४) पत्र क. एनजीसी/२०२१/नॅक/राज्यस्तरीय वेबिनार/औवि/मवि.३/१४०६९ दि. ८.१२.२०२१

५) पत्र क. एनजीसी/२०२२/नॅक (PAC)/ औवि/मवि.३/३५७५ दि. ०५.०४.२०२२

६) प्र. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य पुणे—१ यांचे पत्र क. एनजीसी/२०२२/नॅक/अशा. अनु.म.वि/औवि/ मवि—३६७८ दिनांक २५ जानेवारी, २०२३

७) उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांचे पत्र क. एनजीसी/२०२३/नॅक/अशा.अनु.म.वि/औवि/ मवि—६४६१ दिनांक २३ मे, २०२३

८) विद्यापीठाचे परिपत्रक क्र **Aff./ICC/ (2019-20)/03/ of 2019, dated 10th May, 2019.**

९) **Aff./ICC/ (2021-22)/26/ of 2021 dated 02nd December, 2021.**

१०) **Aff./ICC/ (2022-23)/20/ of 2022 dated 14th November, 2022.**

११) **Aff./ICC/ (2022-23)/20/ of 2023 dated 18th March, 2023**

१२) **Aff./ICC/ (2023-24)/14/ of 2023 dated 26th June, 2023**

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य यांना नॅक मुल्यांकन/ पुनर्मुल्यांकन प्रक्रिया तात्काळ सुरू करून दिनांक ३१ मार्च, २०२३ पर्यंत नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन प्रारंभ टप्प्यातील संस्था नोंदणी (HEI Registration) करून IIQA (Institutional Information for Quality Assessment) नॅक कार्यालयास सादर करणे अनिवार्य आहे. या दिनांकापर्यंत IIQA सादर न केल्यास शैक्षणिक वर्ष २०२३—२४ करिता प्रथम वर्षाच्या प्रवेशास निर्बंध लागू करणेबाबत शासनास प्रस्तावित करण्यात येईल'' असे कळविण्यात आले होते. (प्रत संलग्न) तसेच संलग्नता विभागाने दिनांक २० जून, २०२३ च्या ईमेल दूवारे मुंबई विद्यापीठाशी संलग्नित सर्व अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक यांना नॅक मुल्यांकन/ पुर्नमुल्यांकन व मानांकनाबाबतची माहिती दिलेल्या या https://forms.gle/Ab9ZBdLXj8pzy4Nz9 लिंक मध्ये दिनांक २० जून, २०२३ रोजी संध्याकाळी ६.०० वाजेपर्यंत भरून देण्यासंदर्भात कळविले होते.

परंतु फक्त २४० महाविद्यालयांनी उपरोक्त गुगल लिंक मध्ये माहिती अदयावत केलेली आहे. व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक २७ जून, २०२३ च्या ठरावानुसार आपणांस कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयाची नॅक मुल्यांकन/पुर्नमुल्यांकन बाबत ची माहिती उपरोक्त दिलेल्या ऑनलाईन लिंकवर सात दिवसाच्या आत न भरल्यास आपल्या महाविद्यालयाचे शैक्षणिक वर्ष २०२३–२४ चे प्रथम वर्षाचे प्रवेश रद्द करण्यात येईल. तसेच भविष्यामध्ये आपल्या महाविद्यालयाचे नविन विद्याशाखा/ अभ्यासक्रम/ तुकडी/ विषयांचे मान्यता प्रस्ताव स्विकारले जाणार नाही.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ च्या कलम १०७ (छ) प्रमाणे तसेच मा. संचालक, सहसंचालक तसेच विद्यापीठाने वरील संदर्भित पत्रे/परिपत्रके द्वारे वारंवार सुचना देऊन सुद्धा महाविद्यालयांना नॅक मुल्यांकन तसेच पुर्नमुल्यांकन प्रकिया सुरू केलेली नाही सदर संदर्भात मा. संचालक व विद्यापीठाने गंभीर दखल घेतली आहे. त्यामूळे सर्व महाविद्यालयाने नॅक तसेच पुर्नमुल्यांकनाची प्रकिया सन २०२३–२४ चे प्रवेश सूरू होण्यापूर्वी करावी अन्यथा महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील तरतूदी नूसार या महाविद्यालयांनी नॅक मुल्यांकन तसेच पुर्नमुल्यांकन प्रकिया चालू केली नाही अशा महाविद्यालयांची संलग्नता काढून घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

(प्रा. सुनिल भिरूड)
प्रभारी कुलसचिव

मुंबई–४०० ०३२
३ जुलै, २०२३

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक.

महाराष्ट्र शासन
उच्च शिक्षण संचालनालय,
मध्यवर्ती इमारत, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११००१.

www.dhepune.gov.in फोन नं.०२०/२६१२२११९. Email: mavi.dhepune@nic.in

क्र.एनजीसी/२०२३/नॅक/अशा.अनु.म.वि./औवि/मवि-३/ ६४६२ दि.२३.०५.२०२३

अत्यंत महत्वाचे/कालमर्यादित.

प्रति,

कुलसचिव,
सर्व अकृषि विद्यापीठे
महाराष्ट्र राज्य.

**विषय -अशासकीय महाविद्यालयांच्या नॅक मूल्यांकन/पुनर्मूल्यांकन व मानांकनाबाबत.**

संदर्भ -१.शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण २०१०/(२०/१०)/विशि-३ दि.०८.१०.२०१०.
२.संचालनालयाचे क्र.एनजीसी/२०२२/नॅक/औवि/मवि-३/१०१०० दि.२७.०७.२०२२, १२२०४ दि.०३.१०.२०२२/६७८ दि.२५.०१.२०२३. व ३१७७ दि.२५.०१.२०२३

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, संदर्भ क्र.१ मधील शासन निर्णयानुसार अकृषि विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयांचे मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन अनिवार्य करण्यात आलेले आहे. यामुळे शिक्षणाच्या गुणवत्तेमध्ये अपेक्षित वाढ होऊन उच्च शिक्षणाचा दर्जा वाढण्यास मदत होते.

उच्च शिक्षणाच्या गुणवत्तेचे जतन व संवर्धन व्हावे याकरितां विद्यापीठ अनुदान आयोगाने नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन करणेबाबत निर्देशित केले आहे. या अनुषंगाने संचालनालयाने वेळोवेळी विभागातील शासकीय/अशासकीय महाविद्यालयांचे नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन करुन घेणेबाबत निर्देशित केले आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १०९ मधील पोटकलम ६(ख) मध्ये महाविद्यालयांचे नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकनाची तरतूद नमूद केली आहे. तसेच मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, नागपूर येथील याचिका क्र.५२८०/२०१५ मधील दि.१६.११.२०१६ च्या निकालातही नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकनाचे महत्व अधोरेखित केले आहे.

राज्याची प्रगती होण्यासाठी व जागतिकीकरणाच्या स्पर्धेमध्ये टिकून राहण्यासाठी दर्जेदार उच्च शिक्षण मिळणे आवश्यक आहे. त्यासाठी उच्च व तंत्र शिक्षणाचा दर्जा उंचावणे व त्याची गुणवत्ता वाढविणे आवश्यक आहे. याकरिता महाविद्यालयांचे नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकनाचे महत्व व अनिवार्यता वेळोवेळी अधोरेखित केली आहे. संचालनालयाचे दि.०२ मार्च, २०२३ च्या पत्रान्वये राज्यातील नॅक वैधता संपुष्टात आलेल्या महाविद्यालयांनी "नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन प्रक्रिया तात्काळ सुरु करुन दि.३१ मार्च, २०२३ पर्यंत नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन प्रारंभ टप्यातील संस्था नोंदणी (HEI Registration) करुन IIQA (Institutional Information for Quality Assessment) नॅक कार्यालयास सादर करणे अनिवार्य आहे. या दिनांकापर्यंत IIQA सादर न केल्यास शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता प्रथम वर्षाच्या प्रवेशास निर्बंध लागू करणेबाबत शासनास प्रस्तावित करण्यात येईल" असे कळविण्यात आले होते.

तथापि, बहुतांश पात्र महाविद्यालयांनी अद्यापपावेतो नॅक कार्यालयास नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन प्रारंभ टप्यातील संस्था नोंदणी (HEI Registration) करुन IIQA (Institutional Information for Quality Assessment) नॅक कार्यालयास सादर केला नसल्याचे नॅकच्या संकेतस्थळावरुन निदर्शनास आले आहे. उपरोक्तप्रमाणे वेळोवेळी निर्देश देवूनही महाविद्यालयांनी नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन करुन घेतलेले नाही ही बाब शैक्षणिकदृष्ट्या योग्य नाही. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महाविद्यालयाच्या पायाभूत सुविधामध्ये वाढ होणे व शैक्षणिक गुणात्मक दर्जा वाढीसाठी नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन करुन घेणे आवश्यक आहे.

सबब, अद्यापपावेतो एकदाही नॅक मूल्यांकन व मानांकन न झालेल्या अशासकीय अनुदानित महाविद्यालये व सद्यस्थितीत नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन INACTIVE असलेल्या अशासकीय अनुदानित विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित महाविद्यालयांनी शैक्षणिक वर्ष २०२३-२४ च्या प्रथम वर्ष प्रवेशाच्या प्रारंभ दिनांकापर्यंत IIQA (Institutional Information for Quality Assessment) नॅक कार्यालयास सादर करणे अनिवार्य आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १०९ मधील पोटकलम ६(ख) मध्ये महाविद्यालयांचे नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकनाची

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०९ मधिल पोटकलम ०६ (ख) नुसार

(ख) राज्य शासनाने निर्धारित केलेल्या शर्तीचे ते अनुपालन करीत नसतील तर,राज्य शासनाकडे पाठविणार नाही." अशाप्रकारे तरतूद करण्यात आलेली आहे.

तसेच महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ११० मधिल पोटकलम (४) नुसार "महाविद्यालय किंवा परिसंस्था अधिस्वीकृती किंवा, यथास्थिति, पुनर्रअधिस्वीकृती मिळण्यासाठी पात्र आणि अपेक्षित असेल आणि असे महाविद्यालय किंवा परिसंस्था अधिस्वीकृतीच्या किंवा पुनर्रअधिस्वीकृतीच्या आवश्यकतांची पूर्तता करण्यात कसूर करील तेव्हा, अशा महाविद्यालयाला किंवा परिसंस्थेला विद्यापीठाकडून कोणतीही संलग्नता देण्यात येणार नाही." अशाप्रकारे तरतूद करण्यात आलेली आहे.

सबब, वर नमूद करण्यात आलेल्या महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील तरतूदी व शासन निर्णयात नमूद केलेल्या नॅक मूल्यांकन,मानांकन व पुनर्मूल्यांकन करण्यासाठी अटी व शर्तीचे पालन आपल्या विद्यापीठाच्या परिक्षेत्रातील जे महाविद्यालये शैक्षणिक वर्ष २०२३-२४ च्या प्रथम वर्षाच्या प्रवेशाच्या प्रारंभ दिनांकापर्यंत करणार नाहीत अशा महाविद्यालयांबाबत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील उपरोक्त नमूद सर्व तरतूदीचा अवलंब करुन महाविद्यालयांची संलग्नता काढून घेण्याची कारवाई विद्यापीठांनी करणे क्रमप्राप्त आहे. त्यानुसार सर्व विद्यापीठांनी अशा महाविद्यालयांच्या प्रारंभ दिनांकापर्यंत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल महाविद्यालय निहाय संचालनालयास सादर करावा.

(डॉ.शैलेंद्र देवळाणकर)
प्र.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

प्रत- माहितीस्तव सादर

१.मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२

२.स्वीय सहाय्यक, मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२